# न्यायमूर्ती शरद अरविंद बोबडे



- जन्म – २४ एप्रिल १९५६ (नागपूर)
- बोबडे यांचे वडील **अरविंद बोबडे हे सुद्धा ज्येष्ठ विधिज्ञ आणि महाराष्ट्राचे महाधिवक्ता होते.** न्या शरद बोबडे यांचे शालेय शिक्षण नागपुर मध्ये झाले. त्यानंतर त्यांनी १९७८ साली नागपूर विद्यापीठाशी संलग्नित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातून 'एल. एल. बी.' ची पदवी घेतली. त्यानंतर नागपूर खंडपीठात वकीलीला सुरुवात केली.
- १९७८ साली एल. एल. बी पदवी
- १९९८ साली वरिष्ठ अधिवक्तापद बहाल
- २००० मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्तीपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली.
- १६ ऑक्टोबर २०१२ रोजी न्यायमूर्ती बोबडे मध्यप्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती झाले.

- ❖ **२०१३** ला सर्वोच्च न्यायालयच्या न्यायमूर्ती
- ❖ **२०१६ साली नागपूरच्या महाराष्ट्र** राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या कुलपतीपदी नियुक्ती
- ❖ **१८ नोव्हेंबर २०१९** रोजी सरन्यायाधीशपदी नियुक्ती
- ❖ सरन्यायाधीश म्हणून कारकीर्द **१७ महिन्यांची** असेल
- ❖ **२३ एप्रिल २०२१** ला निवृत्त होणार



# कॉलेजियम मधील मराठी न्यायाधीशांचा भविष्यातील वरचष्मा

- सरन्यायाधीश पदाचा कालखंडात न्या. बोबडे हे कॉलेजियमचेही प्रमुख असतील.

- सध्या कॉलेजियम मध्ये त्यांच्याखेरीज **न्या. ए व्ही रमन्ना, न्या. अरुण मिश्रा, न्या. रोहिंटन नरिमन, न्या. आर भानुमती** हे न्यायाधीश असतील.

- न्यायमूर्ती रमन्ना व न्यायमूर्ती मिश्रा यांच्या निवृत्तीनंतर त्यांची जागा अनुक्रमे न्यायमूर्ती उदय ललित व न्यायमूर्ती अजय खानविलकर हे मराठी न्यायाधीश घेतील.

- कॉलेजियम मध्ये एकाच वेळी **३ मराठी न्यायाधीश** असण्याचा योग प्रथमच येत आहे.



# सरन्यायाधीश व त्यासंबंधित तथ्ये

- न्यायमूर्ती बोबडे यांचे वडील अरविंद बोबडे हे **१९८० व १९८५** मध्ये महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता म्हणून कार्यरत होते.
- न्या. बोबडे यांना सरन्यायाधीश म्हणून **५२३ दिवसांचा** म्हणजे **१ वर्ष ५ महिने** कार्यकाळ मिळणार आहे.
- आतापर्यंत **४६** सरन्यायाधीशांपैकी केवळ **१६** सरन्यायाधीशांना **५०० दिवसांपेक्षा जास्त** कालावधी मिळाला आहे.
- सरन्यायाधीश वाय. व्ही. चंद्रचूड हे **२६९६** एवढे सर्वाधिक **( ७वर्षे ४ महिने २१ दिवस)** दिवस पदावर कार्यरत होते.
- घटनेच्या तिसऱ्या परिशिष्टात उल्लेखित प्रक्रियेनुसार देशाचे राष्ट्रपती सरन्यायाधीशास पद्ग्रहणाची शपथ देतात.
- सरन्यायाधीश निवडीच्या सेवाज्येष्ठता क्रमानुसार २०२२ मध्ये न्या. उदय ललित तर २०२५ मध्ये न्या. भूषण गवई हे सरन्यायाधीश होण्याची शक्यता आहे.
- भारताच्या सरन्यायाधीश पदी कार्य करणारे न्या. एच. जे. कनिया व न्या. एम. एच. कनिया हे एकमेव पिता – पुत्र आहेत.
- सरन्यायाधीश पदावर असतांना राष्ट्रपती पदाची धुरा सांभाळण्याची संधी न्यायमूर्ती मोहम्मद हिदायतुला यांना मिळाली.
- दिवाणी आणि घटनात्मक प्रकरणाबाबत अफाट ज्ञान असलेले न्यायाधीश म्हणून ख्याती असलेले न्यायमूर्ती शरद अरविंद बोबडे हे सर्वोच्च न्यायालयाच्या **४७ व्या** सरन्यायाधीश पदी विराजमान झाले आहेत.

- न्या. शरद बोबडे हे देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदाचा बहुमान मिळवणारे चौथे महाराष्ट्रीयन सरन्यायाधीश आहेत.

## ❖ न्या. शरद बोबडे यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश या नात्याने गेल्या ६ वर्षात दिलेले काही महत्वाचे निर्णय.

### अयोध्या प्रकरण

- रामजन्मभूमी - बाबरी मशिद सर्व वादग्रस्त जागा रामलल्ला च्या ताब्यात देऊन ; मुस्लिमांना पर्यायी मशीद बांधण्यासाठी अयोध्येतच मध्यवर्ती ठिकाणी ५ एकर जागा त्वरित देण्याचा निर्णय दिला. त्यात न्या. बोबडे न्या. रंजन गोगोई यांच्या अध्यक्षतेखाली पिठात सहभागी होते.

### आधार प्रकरण

- मुलभूत सेवा आणि सरकारच्या कल्याणकारी योजनांचे लाभ घेण्यासाठी नागरिकांवर आधारची सक्ती केली जाऊ शकत नाही. असा निर्णय दिला.

### दिल्लीत फटाके बंदी

- वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी संपूर्ण दिल्ली राजधानी क्षेत्रात फटाक्यांची विक्री करण्यास व ते वाजवण्यास बंदी घातली. त्याचबरोबर देशात कमी प्रदूषण करणारे **‘हरित फटाके’** वाजवण्याचा आदेश दिला.

### बसव वचन दीप्ती प्रकरण

- लेखिका माता महादेवी यांच्या ‘बसव दीप्ती’ पुस्तकातील महात्मा बसवेश्वरांवरील आक्षेपार्ह मजकूराणे लिंगायत समाजाच्या धार्मिक भावनांची अवहेलना होत आहे. या सबबीखाली कर्नाटक सरकारने पुस्तकावर घातलेली बंदी न्या. बोबडे यांच्या पीठाने कायम ठेवली.

Right to Privacy बाबतचा निर्णय : – right to privacy हा मूलभूत हक्क ठरवणारा निर्णय दिला.

## ❖ उच्च न्यायालयात असताना दिलेले काही महत्वपूर्ण निर्णय :-

### पर्यावरण संवर्धन

- न्यायमूर्ती बोबडे यांनी **२०११ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख** कृषी विद्यापीठाशी संबंधित एका याचिकेवरील निर्णयात "आपण आभाळ विकू शकतो का?", "जमिनीची ऊब विकू शकतो का?" , " हवेतील ताजेपणाची मालकी मिळवु शकतो का?", पाण्याची चमक खरेदी करु शकतो का?" या वाक्यांचा उल्लेख करुन पर्यावरण संवर्धन करणे काळाची गरज असल्याचे सांगितले.

### मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त

- न्या. बोबडे यांनी **२००४** मध्ये **'एयरपोर्ट अथॅारिटी ऑफ इंडिया'** च्या प्रकरणात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी गरज पडल्यास त्यांना जीवे मारण्याची परवानगी देण्यात यावी असा निर्णय दिला.

### जात वैधता प्रमाणपत्र

- २०१२ साली न्या. बोबडे यांनी **"प्रिय पराते"** या प्रकरणात अर्जदाराच्या रक्ताच्या वंशावळीतील व्यक्तीकडे जात प्रमाणपत्र असल्यास संबंधित अर्जदाराला इतर पुरावे न पाहता जात वैधता प्रमाणपत्र जारी करावे. असा निर्णय दिला.

### जनहित याचिका नियमावली

- **२००४** मध्ये अण्णा हजारे यांच्या प्रकरणात जनहित याचिका म्हणजे काय असते? यावर विस्तृत स्पष्टीकरण म्हणून त्यासंदर्भात नियमावली निश्चित करण्याचे कार्य न्या बोबडे यांच्या पीठाने केले.

## सजीवसृष्टीची सुरक्षा

- २०११ मध्ये न्या. बोबडे यांनी **'सजीव सृष्टी संरक्षणाबाबत'** दिलेला निर्णय महत्वाचा संदर्भ म्हणून वापरला जातो. सजीव सृष्टी धोक्यात येईल असे वर्तन करणे म्हणजे राज्यघटनेने कलम २१ नुसार दिलेला जगण्याचा अधिकार नाकारणे होय. असे मत या निर्णयात त्यांनी व्यक्त केले.

## हेल्मेट सक्ती

- न्यायमूर्ती बोबडे यांनी २००५ मध्ये **'फ्री लीगल अँड कमिटी'** प्रकरणात हेल्मेट सक्ती जनहिताची असल्याचा निर्णय दिला.

# सर्वोच्च न्यायालय






| | |
|---|---|
| स्थापना | - २६ जानेवारी १९५० (१९३५ भारत सरकार कायद्याने स्थापित १ ऑक्टोबर १९३५ च्या संघीय न्यायालयाचे रुपांतर भारतीय सर्वोच्च न्यायालयात केले गेले.) |
| अधिकार क्षेत्र | – भारत , स्थान – नवी दिल्ली |
| न्यायाधीश कार्यकाल | - ६५ वर्ष आयु |
| प्राधिकृत | - भारतीय संविधान |
| निर्णयावर अपील | – भारताच्या राष्ट्रपतींद्वारे क्षमा / दंड पूर्ण |